पीएच्.डी.

संशोधन आराखडा

“संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या साहित्यातील वैज्ञानिक जाणिवांचा चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधनाचा आराखडा

संशोधक

श्री. मुळे अंबादास मारोतीराव

(एम.ए., एम.एड., एम.फिल.)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. नरवाडे भास्कर विठ्ठलराव

(एम.ए., बी.एड., एम.फिल., पीएच्.डी.)

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग

महात्मा गांधी महाविद्यालय, ता. अहमदपूर जि. लातूर

- मराठी संशोधन केंद्र -

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर (महाराष्ट्र) 413517

ऑगस्ट - 2023

"संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या साहित्यातील वैज्ञानिक जाणिवांचा चिकित्सक अभ्यास"

1.1 प्रस्तावना -

संत विशेषतः भक्ती मार्गे अर्थात त्यांच्या भक्तीला कर्म व ज्ञानाचा पदर असतो . परंतु त्यांचा मुख्य भर भक्तीवर असतो . भक्ती कर्म , ज्ञान अथवा पतंजलीचा अष्टांग योग या सर्व योगाचे उद्दिष्ट अंतिमतः मोक्ष, मुक्ती, कैवल्य, आत्मज्ञान हे आहे. ही नावे जरी वेगवेगळी असली तरी अनुभूतीच्या स्तरावर ही अवस्था एकच आहे . कुठल्याही मार्गाने गेले तरी याच ध्येयापर्यंत पोहोचायचे असते . संत साहित्याचा विचार करता संत स्वतःच आत्मज्ञानी, आत्माअनुभवी असल्याने त्यांचे अनुभव त्यांनी कशाप्रकारे मांडले . त्यातून समाजाला मुक्तीचा मार्ग कसा दाखवला हे बघणे महत्त्वाचे ठरते . त्याचबरोबर त्यांच्या अभंगातून विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे. हे या संशोधन कार्यामध्ये पहावयाचे आहे.

या अभ्यासासाठी गेल्या 700 ते 800 वर्षात महाराष्ट्रा चे जनजीवन ढवळून टाकणाऱ्या संत ज्ञानेश्वर, संत नामदेव , संत तुकाराम , संत एकनाथ , संत रामदास व संत चोखामेळा या संतापैकी संत ज्ञानेश्वर , संत नामदेव , संत तुकाराम या तीन संतांची निवड केलेली आहे . या तिन्ही संतांनी मराठी भाषेत प्रचंड साहित्य निर्मिती केलेली आहे . प्रत्येकाची साहित्यकृती ही मराठी भाषेला व महाराष्ट्राला भूषण ठरावी अशा प्रकारचे आहे. त्यांच्या संपूर्ण साहित्याचा सखोल अभ्यास करावयास कदाचित संपूर्ण जन्म देखील पुराव्याचा नाही . त्यांच्या साहित्याचा प्रचंड आवाका लक्षात घेऊन प्रत्येक संतांचा केवळ अभंगातील त्यांनी मांडलेल्या विज्ञानवादी दृष्टिकोन घ्यावयाचा आहे.

ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' भगवदगीतेवर आधारित असल्यामुळे त्या ग्रंथातील विषयांना गीता श्लोकाप्रमाणे क्रम आहे . प्रत्येक अध्यायात भगवंताने एक -एक प्रकारचा योगच सांगितला आहे . आणि विषाणुरूप व संदर्भाच्या गरजेनुसार आपले नातपंथीय हठयोगातील स्व अनुभवाचे बोल 'उपाय' म्हणून सांगितले आहेत . वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक संत नामदेव आणि वारकरी संप्रदायरुपी मंदिराचा कळस असलेले संत तुकाराम यांच्या अभंगाची अजूनही मोठ -मोठ्या विद्वानांना व ज्ञान पंडितांना भूरळ पडत आहे . संत नामदेवांनी जवळपास अडीच हजार अभंग रचना केली, तर संत तुकाराम यांच्या नावे 4000 अभंग आहेत.

1.2 विषय निवडीची भूमिका -

संत वाड्मय संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम यांच्या अभंग रचनेवर आत्तापर्यंत अनेक अभ्यासकाने विचार मांडले आहेत . परंतु संत ज्ञानेश्वर , संत नामदेव व संत तुकाराम तिन्हींच्या अभंग रचनेच्या जाणिवांचा अभ्यास विशेषत: त्यांच्या अभंग रचनेतील सामाजिकता व वैज्ञानिक विचार यांच्या दृष्टिकोनातून विचार झालेला दिसत नाही म्हणून मी काहीसा दुर्लक्षित राहिलेला विषय माझ्या पीए च.डी. संशोधनासाठी निवडला आहे . संत ज्ञानेश्वर व संत नामदेव त्यांचाच वारसा चाल वणारे संत तुकाराम यांच्या अभंग रचनेतील वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा साम्यभेद आढळून येतो का याचे यथायोग्य दर्शन व्हावे . या हेतूने "संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या साहित्यातील वैज्ञानिक जाणिवांचा चिकित्सक अभ्यास " हा विषय पीएच.डी. साठी निवडला आहे . सदर विषयी निवडण्यामागची दुसरी महत्त्वाची भूमिका म्हणजे शालेय स्तरापासून ते पदव्युत्तर स्तरापर्यंत विद्यार्थ्यांना या संतांच्या अभंगातील रचना बहुतांश प्रमाणात भक्ती, नाम, महात्म्य, विठ्ठलमहिमा, संतसंगती आदी दृष्टिकोन समोर ठेवूनच मांडलेली दिसून येते. त्यामुळे यांच्या अभंगातील काही बाजू दुर्लक्षित राहिल्या. त्यातील एक बाजू म्हणजे सामाजिक व वैज्ञानिक दृष्टिकोन दुसरी बाजू म्हणजे यांचा अभंगातील चिकित्सक अभ्यास या अंगानेही अभ्यासकांची सोय व्हावी या अनुषंगाने चिकित्सक लेखन करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रदाय हा अतिशय खूप मोठा संप्रदाय असल्यामुळे अनेक संतांनी त्यामध्ये वेगवेगळ्या स्वरूपाचे कार्य केलेले आहे . त्यांच्या सामाजिक कार्याचा आवाका हा खूप मोठा आहे. मला संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत तुकाराम आधी संतांच्या अभंगाविषयी ओढ निर्माण झाली . 18 पगड जातीच्या लोकांना स्त्री-पुरुष आबालवृद्ध , श्रेष्ठ-कनिष्ठ, गरीब-श्रीमंत असा भेद न मानता सर्वांना समजेल अशी भाषा, सर्वांना परवडेल असा देवभक्त यांच्या कसलेही प्रकारची मत भेद असणार नाही अशा वारकरी संप्रदायाविषयी अधिक सखोल अभ्यास मांडायला हवा असे मला नेहमीच वाटत हो ते. या वारकरी संप्रदायाची प्रवर्तक असलेले संत नामदेव आणि पंथांच्या मंदिरांचा कळस झालेले संत तुकाराम यांच्या अभंग रचनेत कोणकोणत्या गोष्टी, साम्यभेद आढळून येतात . त्यांच्या अभंग रचनेवर तत्कालीन सामाजिक , राजकीय, सांस्कृतिक घटकांचा प्रभाव आहे का यांचा चिकित्सक अभ्यास करून वैज्ञानिक विचार मांडण्याचा प्रयत्न करण्यासाठी या विषयावर संशोधन कार्य करणे मला योग्य वाटले.

1.3 गृहीतके -

1. संत ज्ञानेश्वर , संत नामदेव व संत तुकाराम यांच्या वाड्मय व्यक्तिमत्त्वाची ओळख मांडली आहे.

2. सामाजिक सुधारणा , वैज्ञानिक दृष्टिकोन , विवेकवादी विचार इत्यादींच्या प्रसारासाठी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंग वाड्मयाचा चांगला उपयोग होऊ शकतो.

3. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत तुकाराम यांचे अनेक अभंग सामाजिक चिंतन व वैज्ञानिक विचार व्यक्त करणारे आहेत.

4. आजच्या सामाजिक परिस्थितीतही आधुनिक विचाराबरोबर विज्ञानवादी विचार समाजउपयोगी ठरणारे आहेत.

5. संत ज्ञानेश्वर , संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगातील जाणिवां च्या चिकित्सक अभ्यासाद्वारे त्यांच्या अभंगातील साम्यभेद स्थळे अभ्यासता येतात.

संशोधन विधान -

"संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या साहित्यातील वैज्ञानिक जाणिवांचा चिकित्सक अभ्यास"

1.4 **संशोधनाची उद्दिष्टे -**

1. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या वाड्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे.

2. संत ज्ञानेश्वर , संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगातील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा शोध घेणे.

3. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांचे अभंगातील सामाजिकतेचा शोध घेणे.

4. संत ज्ञानेश्वर , संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगात असले   ल्या सामाजिकतेचा व वैज्ञानिकतेचा चिकित्सक पद्धतीने शोध घेणे.

5. या तीनही संतांच्या अभंगातील सामाजिक ता व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा साम्यभेद मांडण्याचा प्रयत्न करणे.

1.5 संशोधनाची व्याप्ती व संशोधनाची मर्यादा -

प्रस्तुत संशोधन हे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत तुकाराम यांची अभंग रचना, अभंग गाथा व तदनुषंघाने उपलब्ध असणाऱ्या साहित्यापूर तेच व्याप्त असून त्यांच्या एकूण अभंगचनेपैकी वैज्ञानिक विचार मांडणाऱ्या अभंगांचा यात समावेश केला जाणार आहे . तसेच या संशोधन कार्यात ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', अमृतअनुभव, चांगदेवपासष्टी व अनेक अभंग वगैरे प्रचंड ग्रंथसंपदा आहे. त्यापैकी 'ज्ञानेश्वरी' हा त्यांचा प्रमाणग्रंथ हा वास्तविक गीतेवरील भाष्यग्रंथ आहे. भाष्य हा एक परावलंबी वाङ्मय प्रकार आहे. मूळ ग्रंथांचे विवरण ही भाषाची मर्यादित कक्षा असते. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान व वैज्ञानिक विचार यांच्यापर्यंत मर्यादित आहे.

1.6 संशोधन पद्धती -

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगातील वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा अभ्यास करण्यासाठी काही प्रकर णे निश्चित केली आहेत . त्या प्रकरणांचा संशोधनात्मक पातळीवर विचार करणे कर्म प्राप्त ठरते. या तिन्ही संतांच्या साहित्याचा अभ्यास करत असताना वैज्ञानिक विचार तौलनिकदृष्ट्या मांडताना अनेक विद्वान अभ्यासकांचा विचार विश्लेषणात्मक ग्रंथ, समीक्षात्मक ग्रंथ आदींचा संदर्भ लक्षात घेतला जाणार आहे . म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक, संदर्भीय संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे.

1.7 संशोधनाची साधने -

सदर संशोधनासाठी संदर्भ साधने म्हणून पूर्वसुरीची मते अनेक विद्वान अभ्यासकांनी लिहिलेल्या ग्रंथांचा आधार घेतलेला आहे. 'सार्थ ज्ञानेश्वरी रहस्य' देसाई श्रीकांत, सुशील प्रकाशन पुणे-1997. संत नामदेव यांचे अभंगांचा अभ्यास करण्यासाठी संत नामदेवांची गाथा (महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन एकूण अभंग -2337) संत नामदेव चरित्र , काव्य आणि कार्य (महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन) या दोन ग्रंथप्रती प्रमाणभूत मानून आधार घेतला आहे . तसेच संत तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करण्यासाठी संत तुकाराम बावांच्या अभंगाची गाथा ही महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांनी प्रकाशित केलेली प्रत संदर्भासाठी प्रमाणभूत मानून आधाराला घेतली आहे. याबरोबर वारकरी संप्रदायासंदर्भात सखोल माहिती असलेली संदर्भग्रंथ त्या संदर्भाने केलेले लेखन, संशोधन साहित्य इत्यादीचा वापर केला जाणार आहे . तसेच कीर्तनकार, शिक्षणतज्ज्ञ मंडळी, विचारवंत, वाचक यां च्या मुलाखती, चर्चाद्वारे माहिती मिळवण्यात येणार आहे.

1.8 कारवाईची टप्पे -

प्रथमतः संशोधन समस्येचा शोध घेऊन त्या संशोधनाची गरज , महत्त्व, समस्या विधान, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, मर्यादांची मांडणी करणे. त्यानंतर संबंधित साहित्याचा आढावा घेणे. संशोधनासाठी निवडलेल्या पद्धतीनुसार माहिती साधनांच्या संदर्भात संशोधन , अर्थनिर्वचन , विश्लेषण करून प्राप्त माहितीचे वर्गीकरण करणे, तुलनात्मक मांडणी करणे आणि शेवटी निष्कर्ष मांडणे, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचवणे.

1.9 प्रकरण योजना / प्रकरणाची विभागणी -

प्रकरण पहिले - विषय प्रवेश किंवा प्रस्तावना

या प्रकरणात वारकरी संप्रदाय , संत वाड्मय, अभंग एक वाड्मय प्रकार, संत ज्ञानेश्वर , संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगाची परंपरा , रचना याबरोबर च साहित्य म्हणजे काय त्या अनुषंगाने संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगांचा चिकित्सक अभ्यास केला जाईल.

प्रकरण दुसरे - संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत तुकाराम यांचे वाड्मयीन व्यक्तिमत्व

या प्रकरणात संत ज्ञानेश्वर , संत नामदेव व संत तुकाराम यांचा परिचय तत्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती संत ज्ञानेश्वर , संत नामदेव , संत तुकाराम यांच्या अभंगाचे स्वरूप , प्रेरणास्त्रोत प्रभाव , त्यांच्या अभंग वाणीतून प्रतिबिंबित झालेले व्यक्तिमत्व , व्यक्त झालेला वैज्ञानिक विचार यांच्या संदर्भात अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण तिसरे - संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिकता

या प्रकरणात संत ज्ञानेश्वर , संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंग वाणीतील सामाजिक जीवनदर्शनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला जाईल . त्यांच्या अभंग वाणीतून प्रतिबिंबित झालेली तत्कालीन सामाजिक जीवन, कुटुंब व्यवस्था, वर्ग व्यवस्था, सामाजिक नितीनियम, रूढी, परंपरा, संकेत याचे दर्शन धर्मपंथ , सांस्कृतिक जीवन याचे चित्रण आधी संदर्भात वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे - संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगातील वैज्ञानिक विचार

या प्रकरणात विज्ञान म्हणजे काय व वैज्ञानिक विचारांचा व तत्त्वज्ञान विवेकवादी विचार यांचा अभ्यास केला जाईल . संत ज्ञानेश्वर , संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगाद्वारे अभिव्यक्त कसे झाले यांचा विचार केला जाईल . संत ज्ञानेश्वर , संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंग वाणीतून वैज्ञानिक विचार , सामाजिक दृष्टिकोनातून कसे व्यक्त केले आहे यांचा विचार केला जाईल. सदरील प्रकरणांमध्ये या तिन्ही संतांच्या अभंगामधून समाजासाठी झालेला उपयोग व सामाजिक विचाराबरोबर वैज्ञानिक विचारधारेचा केलेला उल्लेख उदाहरणाद्वारे कशा पद्धतीने स्पष्ट केला आहे. याचा विचार या प्रस्तुत प्रकरणात करावयचा आहे.

प्रकरण पाचवे - संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत तुकाराम यांच्या अभंगांचे चिकित्सक विवेचन

प्रस्तुत प्रकरणाद्वारे संत ज्ञानेश्वर , संत तुकाराम व संत नामदेव यांच्या अभंगवाणी असणारी साम्य स्थळे त्यांच्या अभंगवाणीतील अभिव्यक्त झालेला वैज्ञानिक विचार व विचारातील वैविध्यता संत नामदेव यांच्या अभंगातील सामाजिक विचारधारा व संत तुकाराम यांच्या अभंगातून अभिव्यक्त झालेला वैज्ञानिक दृष्टिकोन व संत ज्ञानेश्वर यांनी मांडलेला विज्ञानवादी विचार त्यांच्या अभंगातील साम्य भेद, दाखले, दृष्टांत, अभिव्यक्तीची शैली इत्यादीचे तुलनात्मक विवेचन प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण सहावे - उपसंहार व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात वरील संशोधन आराखड्याप्रमाणे संशोधन करून त्या आधारावर निष्कर्ष मांडण्यात येतील. प्रस्तुत संशोधन आराखडा हा प्राथमिक स्वरूपाचा असून भविष्यात यामध्ये काही बदल करणे आवश्यक वाटल्यास तसा बदल करण्यात येईल.

संदर्भग्रंथ सूची -

1. डॉ. पी.ए. अहिरे - शैक्षणिक संशोधन पद्धती, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.

2. डॉ. भितांडे वी.रा. - शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्य नूतन प्रकाशन, पुणे-2006.

3. अभ्यंकर शंकर - वासुदेव संत ज्ञानेश्वराचा भक्तियोग, आदित्य प्रतिष्ठान, पुणे-2001.

4. भालचंद्र नेमाडे - तुकाराम, साकेत प्रकाशन, औरंगाबाद-1998.

5. विष्णुबुवा जोग - म सार्थ श्री. तुकारामांची गाथा, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई- 1909.

6. साळुंखे आ.ह. - विद्रोही तुकाराम, सदाशिव बागाईतकर स्मृतीमाला, पुणे-1997.

7. संत नामदेवाची गाथा - महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन, मुंबई.

8. दांडेकर मामासाहेब, कृपा प्रसादिक सार्थ - श्री. ज्ञानेश्वरी, श्री प्रकाश यल्लाप्पा कुंदुर, पुणे शके - 1934.

9. धोंड म.वा. - ज्ञानेश्वरी स्वरूप, तत्त्वज्ञान आणि काव्य, राजहंस प्रकाशन, पुणे-2001.

10. जोशी प्र.ण. - मराठी वाड्मयाचा विवेचक इतिहास, प्राचीन काळ, प्रसाद प्रकाशन, पुणे-1998.

11. नेऊरगावकर स. के. - श्री. तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, वरदा प्रकाशन, पुणे-1998.

12. देसाई श्रीकांत - सार्थ ज्ञानेश्वरी रहस्य, सुशील प्रकाशन, पुणे-1997.

13. भिडे बाळकृष्ण आनंद - सार्थ ज्ञानेश्वरी, केशव भिकाजी ढवळे, मुंबई -1994.

14. श्री. नामदेव चरित्र कला आणि कार्य - महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन, मुंबई.

संशोधक

श्री. मुळे अंबादास मारोतीराव

(एम.ए., एम.एड., एम.फिल.)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. नरवाडे भास्कर विठ्ठलराव

(एम.ए., बी.एड., एम.फिल., पीएच्.डी.)

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग

महात्मा गांधी महाविद्यालय,

ता. अहमदपूर जि. लातूर